363

महाराष्ट्र पोलीस

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दि. ०९/०७/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग,निर्णय क्र.न्यायप्र-१०२१/प्र.क्र.१५६/पोल-५अ,०५/०७/२०२४

**विषय :-** महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांच आस्थापनेवर पोलीस उप निरीक्षकांची ११६ अधिसंख्य पदे निर्माण करणेबाबत

**परिपत्रक :-**

******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग,निर्णय क्र. न्यायप्र-१०२१/प्र.क्र.१५६/पोल-५-अ दि.५/०७/२०२४ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०७०५१७५४४९०३२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )

पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक (आस्थापना /प्रशासन / प्रशिक्षण व खास पथके ), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

अपर पोलीस महासंचालक, व संचालक महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.

विशेष पोलीस महानिरीक्षक ( आस्थापना ), महाराष्ट्र राज्य, मुंबई .

संचालक महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.

पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ उपसहायक/ उपसहायक

कार्यासन अधिकारी का.क्र.५

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके मध्ये “ **आस्थापना** “ या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांच्या आस्थापनेवर पोलीस उप निरीक्षकांची ११६ अधिसंख्य पदे निर्माण करणेबाबत..

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः न्यायप्र-१०२१/प्र.क.१५६/पोल-५अ**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक :- ०५ जुलै, २०२४

**वाचा :-**

१) रिट याचिका क्र.१३२२७/२०१८ प्रकरणी मा. उच्च न्यायालय,मुंबई यांचे आदेश दि.२५.०९.२०२३ व दि.२०.०३.२०२४
२) शासन निर्णय समक्रमांक दि.२०.१०.२०२३
३) अपर पोलीस महासंचालक (आस्थापना) पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई यांचे पत्र क्र. पोमसं/५/१०/रिट पिटीशन १३२२७ २०१८/११३/२०२३, दि.१३.०३.२०२४
४) विशेष अनुमती याचिका क्र. १७२८२/२०२४ प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाचे अंतरीम आदेश, दि.२९.०४.२०२४
५) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक-पदनि-२०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दि.२०.०२.२०१६

**प्रस्तावना:-**

रिट याचिका क्र.१३२२७/२०१८ मधील मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि.२५.०९.२०२३ रोजीच्या अंतरीम आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने संदर्भ क्र.२ येथील दि.२०.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये १३१ उमेदवारांना पोलीस उपनिरीक्षक पदाच्या प्रशिक्षणास पाठविण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सदर उमेदवारांमधील एकूण ११६ उमेदवारांचे पोलीस उपनिरीक्षक पदाचे ०९ महिन्यांच्या कालावधीचे मुलभूत प्रशिक्षण दि.२९.०१.२०२४ पासून प्रशिक्षण सत्र क्रमांक १२५ मध्ये महाराष्ट्र पोलीस अकादमी,नाशिक येथे सुरु झाले आहे.

रिट याचिका क्र.१३२२७/२०१८ या प्रकरणी दि.२०.०३.२०२४ मा. उच्च न्यायालयाने अंतिम न्यायनिर्णय दिला आहे. सदर आदेशाच्या दिनांकापासून सहा आठवड्यानंतर दि.२५.०९.२०२३ च्या अंतरीम आदेशानुसार प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आलेल्या १३१ उमेदवारांना ( रुजू झालेल्या ११६ उमेदवारांना ) परत बोलावून, त्यांना त्यांच्या मुळ पदावर पाठविण्याबाबत आदेश दिले आहेत.

मा. उच्च न्यायालय,मुंबई यांच्या दि.२०.०३.२०२४ रोजीच्या आदेशाविरुद्ध, श्री. ज्ञानेश्वर जगन्नाथ घाडगे व इतर यांनी मा. सर्वोच्च न्यायालय येथे विशेष अनुमती याचिका क्र. १७२८२/२०२४ दाखल केली. मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.२९.०४.२०२४ रोजीच्या आदेशान्वये वरील आदेशास स्थगिती दिली आहे.

वरील स्थितीमध्ये प्रशिक्षण सत्र क्र.१२५ मधील ११६ प्रशिक्षाणार्थी पोलीस उपनिरीक्षकांचे वेतन व भत्ते अदा करण्याकरीता महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांच्या आस्थापनेवर प्रशिक्षण कालावधीकरीता पोलीस उपनिरीक्षकांची ११६ अधिसंख्य पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

प्रशिक्षण सत्र क्र.१२५ मधील ११६ प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षकांचे वेतन व भत्ते अदा करण्यासाठी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र. १७२८२/२०२४ मधील आदेशाच्या अधीन राहून महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांच्या आस्थापनेवर दि.२९.०१.२०२४ ते दि.३१.१०.२०२४ या कालावधीसाठी पोलीस उपनिरीक्षकांची ११६ अधिसंख्य पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर अधिसंख्य पदे विविध पोलीस घटकांमध्ये पोलीस उपनिरीक्षकांच्या रिक्त असलेल्या पदांच्या अधिनतेने निर्माण करण्यात आली असल्याने ही पोलीस उप निरीक्षकांची रिक्त पदे ज्या आस्थापनेवर आहेत त्या आस्थापनेवर वेतन काढले जाणार नाही याची खात्री करण्यात यावी.

३. याकरीता होणारा होणारा खर्च "मागणी क्र. बी-१, २०५५ पोलीस, १०९ जिल्हा पोलीस दल, (००) (०१) जिल्हा पोलीस बल" या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२४ व २०२४-२५ या वित्तीय वर्षाकरीता संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांना मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय संदर्भ क्र.५ येथील वित्त विभाग,शासन निर्णय क्रमांक.पदनि-२०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१,दिनांक २०.०२.२०१६ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०७०५१७५४४९०३२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VENKATESH MADHAV BHAT

Digitally signed by VENKATESH MADHAV BHAT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=5f0272b97156a5d2812bad6725ca46fb2671d1da08208cfdd6677fac0afd6bf2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6E277C9088A4CB8B53E535A4642A6800B908C5DBDB3A63175760874EBA717AE1, cn=VENKATESH MADHAV BHAT
Date: 2024.07.05 18:06:32 +05'30'

**( व्यं. मा. भट )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३. अपर पोलीस महासंचालक (आस्थापना/प्रशासन), पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई
४. विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई
५. संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
६. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र -१, मुंबई
७. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
९. जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक
१०. निवडनस्ती (पोल-५अ)